**नियमित दिवाणी दावा क्र. ५४८/२०१७ मधील निशाणी ६१ खालील आदेश**
**(आप्पासो पाटील विरुध्द अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , सांगली वगैरे)**
**(CNR No. MHSN05002234201 7)**

वादीने प्रस्तुत अर्ज साक्षीसमन्स काढण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दिनांक ०९/११/२०१६ रोजी केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने जी चौकशी झाली त्याबाबतचा अहवाल व त्यासंदर्भात साक्षीदार तपासणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट, प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या हेतूने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने मुळ दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी वाद मिळकत विहीरी संदर्भात दिनांक ०९/११/२०१६ रोजी पारीत केलेला आदेश अवैध असल्याचे घोषीत करण्याबाबत अनुतोष मागितल्याचे दिसते. प्रस्तुत अर्जातील विनंती परिच्छेद पाहता दिनांक ०९/११/२०१६ चा आदेश व त्या अनुषंगाने झालेली चौकशी या संदर्भात साक्षीदार तपासणे आवश्यक आहे. दाव्याची सुनावणी सुरु झाली असून वादीचा साक्षीपुरावा सुरू झाला आहे, याबाबत दुमत नाही. अशा परिस्थितीमध्ये वादीस त्यांचे इच्छेनुसार दाव्यातील अनुतोषानुषांने साक्षीदार घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. सबब, दावा प्रलंबित ठेवण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला, असे म्हणणे न्यायोचित होणार नाही. प्राप्त परिस्थिती व उपरोक्त विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने नियमानुसार साक्षी भत्ता भरल्यास विनंतीनुसार साक्षी समन्स काढण्यात यावे.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.09 11:40:10 +0530

**(भगवान म. कारलेकर)**
**सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.**

**इस्लामपूर.**
**दिनांकः– ०७/०३/२०२६.**